CIDCO
WE MAKE CITIES

**CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**

(CIN - U99999 MH 1970 SGC - 014574)

REGD. OFFICE:
"NIRMAL", 2nd Floor, Nariman Point,
Mumbai - 400 021.
PHONE : 00-91-22-6650 0900
FAX : 00-91-22-2202 2509

HEAD OFFICE:
CIDCO Bhavan, CBD Belapur,
Navi Mumbai - 400 614.
PHONE: 00-91-22-6791 8100
FAX : 00-91-22-6791 8166

Ref. No.
No. CIDCO/EE(BPR)/2021/179

Date :
Date06.12.2021

प्रती,

उपवनसंरक्षक, अलिबाग,

हिराकोट तलावा जवळ

अलिबाग, जि. रायगड

विषय: तळोजा नदीवरील पुलाचे बांधकाम व दिवा पनवेल लाईन Over Bridge करिता कांदळवन वनजमीन मागणी

संदर्भ: उपवनसंरक्षक, अलिबाग यांचे कडील पत्र क्र. बी/२०/ जमीन/२६१३/२०२०-२१ दिनांक १६/१२/२०२०

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपल्या कार्यालया कडून उपरोक्त संदर्भान्वये काही त्रुटि सदर केल्या गेल्या आहेत. त्या प्रमाणे या कार्यालयकडून त्रुटींची पूर्तता खालील प्रमाणे सदर करीत आहोत

| अ. क्र. | तपशील | खुलासा |
|---|---|---|
| १. | तळोजा नदीवरील पुलाचे बांधकामाकरिता यापूर्वी ०.०७५४ हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर वनजमिन मागणीचे प्रस्तावास केंद्र शासनाने दिनांक १४/०७/२०१५ अन्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. तथापि आपणाकडून सदर प्रस्तावांतील तत्वत: मंजुरीनुसार पूर्तता न केल्याने सदर प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. आता आपणाकडून सादर करणेत आलेल्या प्रस्तवांत वनजमीन मागणी क्षेत्रातील सर्व्हे नंबर एकसारखे आहेत. तथापि (Alignment) आणखी मार्गामध्ये बदल केलेला दिसून येत आहे. त्यामळे याबाबत खालील | केंद्र शासनाने तत्वत: मंजुर केलेल्या ०.०७५४ हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव हा मागणी क्षेत्र वाढत असल्या मुळे आम्ही सदर प्रस्ताव मागे घेण्या साठी **जोडणी क्रमांक १** नुसार पत्र सादर करीत आहोत. तसेच नव्याने सादर केलेला ०.६७३२ हे हा प्रस्ताव हा पूर्वी सादर केलेल्या प्रस्तावित ठिकाणी व त्याच प्रकल्पासाठीच आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मुद्द्यावर आपणाकडून खुलासा होणे आवश्यक आहे.<br>अ) यापूर्वी दाखल केलेला ०.०७५४ हेक्टरचा प्रस्ताव आता दाखल करणेत आलेला ०.६७३२ हेक्टरचा प्रस्ताव हा एकच आहे अगर कसे?<br>ब) जर एकच प्रकल्प असेल प्रस्तावित आणखी मार्गात बदल होऊन क्षेत्राची वाढ होत असेल तर पूर्वी सादर केलेला प्रस्ताव काढून घेणेत येणार आहेत अगर कसे? | |
| २. | केंद्र शासनाने तत्वतः मंजुर केलेल्या प्रस्तावामध्ये आखणी मार्गामध्ये बदल करून स. नं.२६९ मध्ये सुरवातीचे chainage दाखविले आहे. नवीन प्रस्तावामध्ये आखणी मार्गामध्ये बदल करून स. नं.२६९ ऐवजी २७० मध्ये exiting road पासून प्रस्तावित रस्ता दर्शविला आहे. दोन्ही प्रस्ताव जोड रस्ता व पुलाचे बांधकाम करीता सादर केलेले आहेत. तथापि प्रस्तावमध्ये अक्षांश/रेखांशचे तपशिलामध्ये बदल आहे. त्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे. | केंद्र शासनाने तत्वतः मंजुर केलेल्या ०.०७५४ हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव हा मागणी क्षेत्र वाढत असल्यामुळे प्रकल्प यंत्रणा मागे घेत आहे व वाढीव क्षेत्रा साठी नव्याने प्रस्ताव सादर करीत आहे. तसेच त्या साठी लागणारे हमीपत्र जोडणी क्रमांक १ नुसार सादर करीत आहोत. सध्या दाखल केलेला प्रस्ताव हा ०.६७३२ हे एवढ्या क्षेत्रा साठी चा आहे |
| ३. | नवीन दाखल केलेला वन जमीन मागणी प्रस्तावा तळोजा नदीवरील Bridge दिवा पनवेल रेल्वे मार्ग व राष्ट्रीय महामार्गावरील overhead Bridge करिता सादर केलेला आहे. केंद्र शासनाने तत्वतः मंजूर दिलेल्या जुन्या प्रस्तावामध्ये दिवा पनवेल रेल्वे मार्गाकरिता व राष्ट्रीय महामार्गावरील Overhead Bridge करिता वनजमीन मागणी प्रस्तावात आखणी मार्ग दर्शविलेला नाही. शिवाय सदर Alignment मध्ये बाधित होणारे कांदळवन क्षेत्र प्रस्तावामध्ये समाविष्ट केलेले नाही. | नव्याने दाखल केलेला प्रस्ताव हा तलोजा नदी वरील क्षेत्रा पुरता च मर्यादित आहे. परंतु connectivity दर्शविण्यासाठी प्रकल्पाच्या नावा मध्ये बदल करण्यात आला आहे. तसेच प्रस्तावामध्ये दाखल केलेले कंदळवन क्षेत्र हे MRSAC नकाशा प्रमाणे आहे व Alignment मध्ये बाधित होणारे कांदळवन क्षेत्र प्रस्तावामध्ये समाविष्ट केलेले आहे. |
| ४. | Google Earth उपग्रह नकाशामध्ये मौजे तळोजा पाचनंद ता. पनवेल येथील या गावांचे स.नं./गट नं. २६१, २५९, २५५, २४७, २४४, २४७, ३२० पत्रांतील नवीन कांदळवन क्षेत्र प्रस्तावित रस्त्यांचे आखणी मार्गामध्ये बाधित होत आहे. तथापि प्रकल्प यंत्रणेने केवळ स. नं. २४४,२४५,२४६,२४७ व ३२० यापैकी मर्यादित क्षेत्रापुरता कांदळवन क्षेत्र दर्शविलेले आहे. Google Earth नकाशाप्रमाणे नवीन तयार झालेले कांदळवन क्षेत्र वनजमिन मागणी प्रस्तावामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. | सदर प्रस्ताव हा "एमआरसेक" चा नकाशा प्रमाणे सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात वळतीकरण केली असलेली जागा ही "एमआरसेक" चा नकाशा प्रमाणे आहे. त्यानुसार बाधीत वनक्षेत्र हे ०.६७३२ हे. इतकेच आहे. स.नं./गट नं. २६१, २५९, २५५ या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कांदळवन क्षेत्र नाही त्यामुळे सादर प्रस्तावात वनजमिन या स.नं./गट नं साठी मागणी क्षेत्र समाविष्ट केलेले नाही. Google Earth च्या Historical Imagery **जोडणी क्र. २** द्वारे सादर करीत आहोत. |

| | | |
|---|---|---|
| ५. | मौजे पेणधर, ता. पनवेल या Google Earth उपग्रह नकाशामध्ये स.नं./गट नं. २९७,८८,८९,९२,९१,२९७,८८, या स. नं. पैकी मर्यादित क्षेत्रापुरते कांदळवन क्षेत्र प्रस्तावांत समाविष्ट केलेचे दिसून येत आहे. जागेवरील अस्तित्वात असलेले कांदळवन क्षेत्र वनजमिन मागणी प्रस्तावामध्ये अंतर्भूत होणे आवश्यक आहे. | सदर प्रस्ताव हा "एमआरसेक" चा नकाशा प्रमाणे सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात वळतीकरण केली असलेली जागा ही "एमआरसेक" चा नकाशा प्रमाणे आहे. त्यानुसार बाधीत वनक्षेत्र हे ०.६७३२ हे. इतकेच आहे. सादर प्रस्तावामध्ये स.नं./गट नं. २९७,८८ या क्षेत्रा मध्येच कांदळवन क्षेत्र आहे व इतर ठिकाणी कांदळवन दिसून येत नाही. Google Earth च्या Historical Imagery **जोडणी क्र. ३** द्वारे सादर करीत आहोत |
| ६. | Index Map 1:50000 या प्रमाणातील नकाशामध्ये वनजमिन मागणी क्षेत्र व कांदळवनाचे क्षेत्र नकाशामध्ये अधोरेखित केलेली नाही. | Index Map 1:50000 या प्रमाणातील नकाशामध्ये वनजमिन मागणी क्षेत्र व कांदळवनाचे क्षेत्र नकाशामध्ये अधोरेखित करुन सादर करीत आहोत **जोडणी क्र. ४ अन्वये** |
| ७. | मौजे पेणधर व तळोजे पाचनंद ता. पनवेल या गावांचे क्षेत्रातून Exiting Road चे क्षेत्र नकाशामध्ये दर्शवून प्रस्तावित वनजमिन मागणी क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे. Exiting Road व Proposed Road मध्ये बाधित होणारे सर्व्हे नंबरचे क्षेत्र नकाशा मध्ये दर्शविणे आवश्यक आहे. | Exiting Road व Proposed Road मध्ये बाधित होणारे सर्व्हे नंबरचे क्षेत्र नकाशा मध्ये अधो रेखित करुन सादर करीत आहोत **जोडणी क्र. ५ अन्वये** |
| ८. | दिवा पनवेल रेल्वे लाईन व प्रस्तावित Over Bridge चे क्षेत्र Location Map मध्ये अधोरेखित केलेले नाही. | प्रस्तावित Over Bridge चे क्षेत्र Location Map मध्ये अधोरेखित करीत आहोत **जोडणी क्र. ६ अन्वये** |
| ९. | प्रस्तावाचे Google Map मध्ये बाधीत होणारे रस्त्याचे स नं. व गावाचे सीमा अधोरेखित केलेल्या नाहीत. | Google Map मध्ये बाधीत होणारे रस्त्याचे स नं. व गावाचे सीमा अधोरेखित करून सादर करीत आहोत **जोडणी क्र. ७ अन्वये** |
| १०. | प्रस्तावित क्षेत्राचे आखणी मार्गाचे Google Earth historical imagery द्वारे तपासणी केली असता मौजे पेणधर ता. पनवेल येथील स. न. ८८, ८९, ९२ व ९१ मधील अस्तित्वात असलेले कांदळवन (Mangorve) क्षेत्रात कोणतेही वनेत्तर कामासाठी पूर्व परवानगी न घेता मातीचा भराव, रस्ता व RCC bridge करीता वनेत्तर कामे सुरू केली असलेचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणात वनभंग केल्याचे दिसून येत आहेत. तरी त्या त्याबाबत प्रस्तावांत वनभंग टिप्पणी देणे आवश्यक आहे. | मौजे पेणधर ता. पनवेल येथील स. नं. ८८, ८९, ९२ व ९१ या ठिकाणी कोणते ही कांदळवन क्षेत्र अस्तीत्वात नव्हते व सदर ठिकाणी कोणत्या ही प्रकारचे वनभंग झालेले नाही. त्या करिता Google Earth historical imagery सादर करीत आहोत **जोडणी क्र. २, ३ अन्वये** |
| ११. | प्रस्तावांत मागणी क्षेत्राचे व प्रकल्पांत बाधीत होणारे | प्रस्तावांत मागणी क्षेत्राचे व प्रकल्पांत बाधीत |

| | | |
|---|---|---|
| | वणेतर क्षेत्राचे ७/१२ उतारे प्रस्तावांत सामील करण्यात यावेत. तसेच सदर ७/१२ उताऱ्यांचे आंग्ल भाषेतील भाषांतरित ७/१२ देखील प्रस्तावांत सामील करणेत यावेत. | होणारे वणेत्तर क्षेत्राचे ७/१२ उतारे प्रस्तावांत सादर करीत आहोत. तसेच सदर ७/१२ उताऱ्यांचे आंग्ल भाषेतील भाषांतरित ७/१२ प्रस्तावांत सादर करीत आहोत. **जोडणी क्र. ८ अन्वये** |
| १२. | प्रस्तावांत वन हक्क अधिनियम, २००६ अंतर्गत प्रस्तावित क्षेत्रांतील वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे. | वन हक्क अधिनियम, २००६ अंतर्गत प्रस्तावित क्षेत्रांतील वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कडे मागणी प्रस्ताव या पूर्वी सादर केलेला आहे |
| १३. | प्रस्तावांत १ ते ५७ बाबींची चेकलिस्ट सामील करून त्यानुसार आवश्यकते प्रमाणपत्र व दस्तऐवज प्रस्तावांत सामील करणेत यावीत. त्याबाबतची पान क्रमांक चेकलिस्टवर नमुद करण्यात यावेत. | प्रस्तावांत १ ते ५७ बाबींची चेकलिस्ट सामील करून त्यानुसार आवश्यक ते प्रमाणपत्र व दस्तऐवज प्रस्तावांत सामील करून सादर करीत आहोत **जोडणी क्र. ९ अन्वये** |
| १४. | प्रस्तावांत सामील क्षेत्र विवरण तक्त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. | सामील क्षेत्र विवरण तक्त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी करुन सादर करीत आहोत **जोडणी क्र. १० अन्वये** |
| १५. | प्रस्तावांत रस्त्याचा क्रॉस सेक्शन प्लॅन सामील करणेत यावा. | रस्त्याचा क्रॉस सेक्शन प्लॅन सादर करीत आहोत **जोडणी क्र. ११ अन्वये** |

सदर पूर्तता ग्राह्य धरून प्रस्ताव हा पुढील कार्यवाहीस रवाना करावा ही विनंती.

धन्यवाद

06/12/2021

( Mr. A. B. Baile )
Executive Engineer(BPR)
Kharghar Station complex,
Kharghar Navi Mumbai